निलंबन प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी
समितीची स्थापना...

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक निप्रआ -२००८/प्र.क्र.९/०८/११-अ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक :- २८ मार्च, २००८

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक ईएसबी-११०७/प्र.क्र३५/२००७/१३, दिनांक १३ जुलै, २००७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१३९६/प्र.क्र६/०६/११-अ, दिनांक २० जूलै,२००६
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१३०७/प्र.क्र३/०७/११-अ, दिनांक १८ आक्टोबर,२००७

## शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त अपिल) नियम १९७९ मधील नियम (४) नुसार निलंबित केलेल्या शासकीय सेवकाच्या निलंबन प्रकरणाचा आढावा घेऊन पुनःस्थापित करण्याकरीता सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झालेले निलंबनाचा आढावा घेण्यासाठीचे प्रस्ताव वरील संदर्भ क्रमांक-१ येथील शासन निर्णयाव्दारे गठीत केलेल्या आस्थापना मंडळ क्रमांक-१ समोर ठेवण्यात येत असत आणि आस्थापना मंडळ क्रमांक-१ या प्रस्तावांचा आढावा घेऊन निलंबन उठवावयाचे अथवा पुढे सुरु ठेवावयाचे याबाबत शासनास शिफारस करीत असे.आता संदर्भ क्रमांक-२ व ३ येथील शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीन्वये आस्थापना मंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येत असून या समितीची रचना खालील प्रमाणे राहिल.

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव | **अध्यक्ष** |
| २) | अप्पर मुख्य सचिव (गृह)<br>गृह विभाग | **सदस्य** |
| ३) | अप्पर मुख्य सचिव (सेवा)<br>सामान्य प्रशासन विभाग | **सदस्य** |
| ४) | महासंचालक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | **सदस्य** |

याशिवाय श्री.आर.जी.बनसोड, प्रधान सचिव (कामगार) उद्योग,उर्जा व कामगार विभाग यांचा मागासवर्गीय हिताचे रक्षण / प्रतिनिधीत्व करण्यासाठी सदस्य म्हणून उपरोक्त समितीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

उपरोक्त समिती निलंबित केलेल्या शासकीय सेवकाच्या निलंबन प्रकरणांचा आढावा घेऊन पुनःस्थापित करण्याचा निर्णय घेतील. सदर समितीची बैठक दर ३ महिन्यानी घेण्यात येईल.

( सतीश त्रिपाठी )
**अपर मुख्य सचिव (सेवा)**

कृ.मा.प.

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
अप्पर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र शासन, वरळी, मुंबई
श्री.आर.जी.बनसोड, प्रधान सचिव (कामगार), उ.उ.व का.वि.
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
उप सचिव कार्यासन १०,११, व १३ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.